


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३०३ ●मंगळवार, दि.०३ फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# अजितदादांच्या विमानात ५ नव्हे ६ प्रवासी ?

## उज्ज्वल निकमांची मोठी प्रतिक्रिया, घातपातावरही केलं भाष्य

**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्र पोरका झाला आहे. आता या विमान अपघातावरून राजकीय वर्तुळात नव्या वादाला तोंड फुटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांनी या अपघाताबाबत शंका उपस्थित केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ आणि भाजपचे राज्यसभा खासदार उज्ज्वल निकम यांनी आपली भूमिका स्पष्ट केली असून, पुराव्याशिवाय या घटनेला वेगळी कलाटणी देऊ नका, असा सल्लाही त्यांनी दिला आहे. अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी खळबळजनक प्रश्न उपस्थित केला होता. विमान अपघातात आधी सहा जणांचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात आलं होतं, मग घटनास्थळी केवळ पाच जणांचेच मृतदेह कसे सापडले ? असा सवाल मिटकरी यांनी केला होता. त्यांच्या या विधानामुळे या अपघातामागे काही घातपात होता का ? अशा चर्चांना सोशल ▶▶ उर्वरित पान २ वर



### ● उज्ज्वल निकम यांनी मांडली कायदेशीर बाजू

या सर्व शंकांचे निरसन करताना उज्ज्वल निकम यांनी अत्यंत परखड मत मांडले आहे. ते म्हणाले की, अजितदादांच्या विमानात सहा प्रवासी होते, असे दर्शवणारा कोणताही अधिकृत पुरावा आजपर्यंत समोर आलेला नाही. अपघाताच्या वेळी विमानात इतक्या मोठ्या प्रमाणात इंधन होते की, आगीमुळे मृतदेह पूर्णपणे जळून खाक झाले. अशा गंभीर परिस्थितीत विनाकारण संशय निर्माण करून घटनेला वेगळं वळण देणं चुकीचं आहे.

### ● 'कट' सिद्ध करण्यासाठी पुराव्यांची गरज

अनेकांनी या अपघातामागे कट असल्याचा संशय व्यक्त केला आहे. यावर भाष्य करताना निकम यांनी सांगितले की, जर कोणाला वाटत असेल की हा एखादा कट आहे, तर कायद्याच्या भाषेत तो सिद्ध करण्यासाठी प्राथमिक पुराव्यांची गरज असते. सध्या तरी असा कोणताही पुरावा समोर आलेला नाही. त्यामुळे निष्कारण वावड्या उठवणं योग्य नाही.

# विलीनीकरण करायचे असेल तर भाजपला विचारावेच लागेल!

## भुजबळांचे राष्ट्रवादीच्या भविष्याबाबत मोठे विधान

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या अस्थी कलशाचे दर्शन घेण्यासाठी जनसागर लोटत असतानाच, दुसरीकडे राष्ट्रवादी



काँग्रेसच्या (अजित पवार गट) भवितव्याबाबत आणि दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत चर्चांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकमध्ये पत्रकारांशी संवाद साधताना अत्यंत परखड आणि महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. विलीनीकरणाचा निर्णय भाजपशिवाय अशक्य- राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# अजितदादांच्या अंत्यसंस्कारावेळी गर्दीत घडली संतापजनक घटना , 7 जणांना अटक ; नेमकं काय घडलं ?

**बारामती । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्रभर शोककळा पसरलेली असतानाच बारामती येथे अंत्यसंस्कारावेळी संतापजनक घटना घडली. शोकाकुल वातावरणात जमलेल्या हजारो नागरिकांच्या गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्यांनी मोठ्या प्रमाणावर दागिने लंपास केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.




अंत्यसंस्काराच्या गर्दीत चोरट्यांचा डाव : अजित पवार यांच्यावर बारामतीतील विद्या प्रतिष्ठान मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले. महाराष्ट्राच्या विविध भागांतून लाखो नागरिक आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी दाखल झाले होते. या भावनिक वातावरणात गर्दीचा फायदा घेत चोरट्यांच्या टोळीने तब्बल १५ जणांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावून पळ काढला. चोरी गेलेल्या दागिन्यांची अंदाजे किंमत २५ ते ३० लाख रुपये इतकी असल्याची माहिती समोर आली आहे.

२८ जानेवारी रोजी विमान अपघातात अजित पवार यांचं निधन झालं, तर दुसऱ्या दिवशी २९ जानेवारीला त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या काळात नागरिक अत्यंत दुःखी आणि भावनाविवश असताना चोरट्यांनी इतक्या निर्ढावपणे हातसफाई केल्यामुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली. काही नागरिकांनी या प्रकारानंतर पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही ▶▶ उर्वरित पान २ वर

## खाकीचा धाक इतका की ! घटना तशीच, नावात , जागेत बदल पुन्हा ३० वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून हत्या

**शिरूर का. । प्रतिनिधी**

जिल्ह्यात फक्त आरोपींच्या नावात, घटना स्थळांच्या, पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये बदल होतो आहे. मात्र हत्येचे सत्र दररोज सुरू आहे. पोलीस अधीक्षकांनी इतकी कायद्याची जरब ईतकी बसवली आहे की गुन्हेगारांना कमी आणि जनतेलाच कधी कुठे काय घडेल म्हणून धास्ती बसली असल्याचं पाहायला मिळत आहे. शिरूर तालुक्यातील खोकरमोह शिवारात एका ३० वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची घटना सोमवार दि.२ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली असून घटनास्थळी पोलीस दाखल झाले आहेत. शिरूर का.तालुक्यातील खोकरमोह शिवारात रायमोह येथील कलरचे काम करणारा चांद उर्फ (गुड्डू) अलाउद्दीन तांबोळी वय ३० वर्ष या तरुणाचा दगडाने ठेचून निर्घृण खून केल्याची घटना सोमवारी सकाळी ८ च्या सुमारास उघडकीस आली असून खुनाचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. घटनास्थळी शिरूर पोलीस ठाण्याचे पोनि. प्रवीण जाधव व रायमोह पोलीस चौकीचे रवी उबाळे व अन्य कर्मचारी दाखल झाले असून पुढील तपास सुरु आहे.

## बीड शहर हादरले ;आदित्य महाविद्यालयात विद्यार्थ्यावर मारहाण चाकू हल्ला: विद्यार्थ्यांच्या छातीवर चाकूने वार, हात फ्रॅक्चर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नामांकित आदित्य महाविद्यालयात दोन विद्यार्थ्यांमधील वादाचे गंभीर रूपांतर होत चाकू हल्ल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे महाविद्यालय परिसरात एकच खळबळ उडाली असून विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय देशमुख या विद्यार्थ्याने आदित्य सुनील गाडे या विद्यार्थ्यावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात गाडे यांच्या छातीवर वार झाला असून त्यांचा हात फ्रॅक्चर



झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सुदैवाने, गाडे यांच्या मित्राने प्रसंगावधान राखत पुढील वार होण्यापासून त्यांना वाचवले.

जखमी विद्यार्थ्यावर सध्या बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पेठ बीड पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपी अक्षय देशमुख याला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. महाविद्यालय परिसरात अचानक घडलेल्या या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवाजीनगर पोलिस ठाण्यात १९ वर्षीय तरुणीकडून खोटी तक्रार

## मुलीने अत्याचाराचा काल्पनिक बनाव उघड ;रिक्षा चालकाला मात्र नाहक त्रास

**बीड । प्रतिनिधी**

शहरात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणीवर चालत्या रिक्षामध्ये लैंगिक छेडछाड आणि अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची तक्रार २६ नोव्हेंबर २०२५ रोजी दाखल झाल्याने बीड जिल्हा हादरून गेला होता. त्यावर शिवाजीनगर पोलिसांनी माने कॉम्प्लेक्स परिसरातील तसेच बीड शहरातील बस स्थानक व इतर ठिकाणची सीसीटीव्ही तपासून रिक्षा चालकाला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते मात्र शिवाजीनगर पोलिसाच्या तपासात हे धक्कादायक प्रकरण एक काल्पनिक बनाव असल्याचे उघड झाले आहे.

दिलेल्या तक्रारीत तरुणीने म्हटले होते की, दुपारी ४ वाजता क्लासवरून घरी जाताना रिक्षा चालकाने तिला नगर रोडवरील निर्जनस्थळी नेले. तिथे रिक्षातील एका सहप्रवाशाने तिचे तोंड दाबून अत्याचाराचा प्रयत्न केला आणि विरोध केल्यावर तिला मारहाण केली. या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी तातडीने पथकासह तपास सुरू केला. मात्र, तपासादरम्यान पोलिसांना अनेक विसंगती आढळल्या. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, पीडितेने सांगितलेल्या वेळेत ती रिक्षातून थेट आपल्या घराच्या दिशेने जाताना दिसली, तसेच तिने सांगितलेल्या घटनास्थळाचा कोणताही पुरावा पोलिसांना मिळाला नाही. वारंवार विचारणा करूनही तिला नेमके ठिकाण सांगता येत नव्हते. त्यामुळे संशय बळावला. ▶▶ उर्वरित पान २ वर

# पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता कार्यालय परळी वैद्यनाथ येथून स्थलांतरित करण्यात येऊ नये यासाठी प्रयत्नशील : धनंजय मुंडे

## ४ महिन्यांपूर्वीच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन केली होती लेखी विनंती ; सकारात्मक कार्यवाहीचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

**परळी वै. । प्रतिनिधी**

पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता कार्यालय परळी वैद्यनाथ येथून स्थलांतरित करू नये, यासाठी आपण प्रयत्नशील असून याबाबत ४ महिन्यांपूर्वीच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांची भेट घेऊन लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे तसेच मुख्यमंत्री महोदयांनी जलसंपदा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

काही माध्यमांमध्ये परळी वैद्यनाथ येथील पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता कार्यालय परळी येथून परभणी येथे स्थलांतरित करण्यात येत असल्याबाबत वृत्त प्रसिद्ध केले आहे, त्याबाबत धनंजय मुंडे यांनी माहिती दिली आहे. परळी वैद्यनाथ येथील पाटबंधारे



विभागाच्या कार्यालयाच्या माध्यमातून बीड सह लातूर व परभणी जिल्ह्यातील काही भागाचे कामकाज सुरळीतपणे सुरू आहे. सदर कार्यालयाची स्थापना १९९५ साली करण्यात आलेली असून प्रशासकीय कारणास्तव हे कार्यालय स्थलांतरित करण्याची प्रक्रिया विभागाने प्रस्तावित केली होती.

मात्र या कार्यालयाची इमारत सुस्थितीत असून कामकाज व्यवस्थितपणे सुरू आहे, तसेच तिन्ही जिल्ह्यांच्या कामकाजाच्या हिशोबाने परळी हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने हे कार्यालय बंद किंवा स्थलांतरित करण्यात येऊ नये, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस तसेच मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांना लेखी पत्राद्वारे दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी केली होती, तसेच याविषयी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन विनंती केली होती, त्याप्रमाणे मुख्यमंत्री महोदयांनी संबंधित विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना हे कार्यालय स्थलांतरित न करण्याबाबत निर्देश दिले असून, हे कार्यालय स्थलांतरित करण्यात येऊ नये, यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले आहे.

## कारच्या धडकेत शिंदे सेनेच्या तालुका उपप्रमुख ठार

**केज । प्रतिनिधी**

केज - अंबाजोगाई रस्त्यावर ढाकेफळ शिवारातील हॉटेल कारभारी समोर भरधाव कारने दुचाकीला जोराची धडक दिलेल्या या अपघातात दुचाकीवरील शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) केज तालुका उपप्रमुख चंद्रकांत शहाजी इंगळे (वय ५० रा. सादोळा) हे जागीच ठार झाल्याची घटना रविवारी (दि. १) सायंकाळी



सहा वाजता घडली.

सादोळा (ता. केज) येथील चंद्रकांत शहाजी इंगळे (वय ५०) हे शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) केज तालुका उपप्रमुख होते. ते रविवारी पिसेगाव येथे रेणुका देवीच्या यात्रेत दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन पिसेगाव येथून परत सादोळा या गावी दुचाकीवरून (एम. एच. ४४ एसी ▶▶ उर्वरित पान २ वर






# शिक्षणातील समाज माध्यमांचा वापर एक वरदान




**सर्व प्रथम समाजमाध्यम म्हणजे काय हे समजून घेऊया...**

साधारणपणे अंतरजाल म्हणजे इंटरनेटवर उपलब्ध असणारा,विविध व्यक्तींशी संपर्क साधू देणारा व ते जपू देणारा मंच म्हणजे समाजमाध्यम जाळ्याचे असे गट जिथे समान विचारांची, सारख्या आवडीनिवडींची माणसे एकत्र येतात.यात आपल्याला समाजमाध्यमांची जागतिक सात सी(saven C) समजून घ्यवे लागेल...आता हि कोणी ठरवली तर नॉलेज एन्थुशियस्टच्या मते, सोशल मीडिया मार्केटिंगचे ७ सी म्हणजे कम्युनिटी, कंटेंट, क्युरेशन, क्रिएशन, कनेक्शन,कम्युनिकेशन आणि कन्व्हर्जन.हे सात सी आणि प्रत्येकाचे माध्यम काय आहे हे समजून घेतल्याने शिकणाऱ्यांना समाजमाध्यमांची मदत होण्यास मदत होते.

समाजमाध्यमांचा शिक्षणातील वापर हे एक मोठे वरदान आहे, कारण यामुळे विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया अधिक परस्परसंवादी, सोयीस्कर आणि व्यापक होते; यात माहितीचा जलद प्रसार, तज्ज्ञांशी संपर्क, सहयोगी शिक्षण, आणि डिजिटल कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते, ज्यामुळे पारंपरिक वर्गाच्या पलीकडे जाऊन ज्ञानाची देवाणघेवाण शक्य होते.

शिक्षणात समाजमाध्यमांचे वापर वरदान जरा विस्ताराने पाहूया-

१.सहयोगी शिक्षण (Collaborative Learning): विद्यार्थी प्रकल्पांवर एकत्र काम करू शकतात, कल्पनांची देवाणघेवाण करू शकतात आणि शिक्षकांना तसेच सहकाऱ्यांना प्रश्न विचारू शकतात.

२.विस्तृत संसाधनांची उपलब्धता (Access to Resources): YouTube ट्युटोरियल्स, ऑनलाइन कोर्सेस आणि तज्ञांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते, ज्यामुळे शिकणे समृद्ध होते.

३.संवादात वाढ (Increased Engagement): जे विद्यार्थी वर्गात बोलण्यास कचरतात, ते ऑनलाइन चर्चांमध्ये सक्रियपणे भाग घेतात, ज्यामुळे त्यांची शिकण्याची प्रक्रिया सुधारते.

४.डिजिटल कौशल्यांचा विकास (Digital Skills Development): विद्यार्थी जबाबदारीने ऑनलाइन संवाद साधायला शिकतात आणि व्यावसायिक जीवनासाठी आवश्यक डिजिटल कौशल्ये विकसित करतात.

५.माहितीचा त्वरित प्रसार (Instant Information Sharing): शिक्षक घोषणा करू शकतात आणि विद्यार्थी त्वरित अभ्यास साहित्य, व्हिडिओ आणि लिंक्स शेअर करू शकतात.

६.जागतिक जागरूकता (Global Awareness): विद्यार्थी जगभरातील घटना, नवीन शोध आणि सामाजिक मुद्द्यांबद्दल अद्ययावत राहू शकतात.

७.सर्जनशीलता आणि गंभीर विचार (Creativity & Critical Thinking): मल्टीमीडिया सामग्रीच्या वापरामुळे सर्जनशीलता वाढते आणि विविध स्त्रोतांमधून माहितीचे विश्लेषण केल्याने चिकित्सक विचार विकसित होतो.

८.तज्ञांशी जोडणी (Connecting with Experts): विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील तज्ञांना फॉलो करू शकतात आणि त्यांच्याकडून उपयुक्त माहिती मिळवू शकतात.

शिक्षणात समाजमाध्यमांचा वापर कसा वरदान आहे उदाहरणे पाहूया :-

१.व्हॉट्सॲप किंवा टेलिग्राम ग्रुप्सद्वारे अभ्यास गट तयार करणे.

२.यूट्यूब चॅनेल्सद्वारे संकल्पना समजून घेणे.

३.शिक्षकांशी थेट संवाद साधणे आणि शंका विचारणे.

४.संस्थेच्या सोशल मीडिया पेजद्वारे अपडेट्स मिळवणे.

थोडक्यात काय तर, समाजमाध्यमान्चा शिक्षणासाठी एक शक्तिशाली साधन आहे, जे शिकणे अधिक गतिमान आणि प्रभावी बनवते, पण त्याचा वापर योग्य आणि जबाबदारीने करणे आवश्यक आहे.म्हणजेच शिक्षणासाठी समाजमाध्यमांचा वापर वरदानाची संजीवनीच म्हणावे लागेल. धन्यवाद !!

**लेखक-श्री. सुभाष रामचंद्र राठोड,**
**प्राथमिक शिक्षक रायगड जिल्हा परिषद**
**ग्रामीण उत्कृष्ट उच्च प्राथमिक शाळा**
**वडगाव ता.खालापूर जि.रायगड**
**मो.9011858485**

◆ पान ४ वरून पुढे...

## अजितदादांच्या विमानात...

मीडियावर उधाण आलं होतं. अजित पवार यांच्यासह पाच जणांचा या भीषण दुर्घटनेत मृत्यू झाला आहे. प्रशासनाकडून या प्रकरणाचा तांत्रिक तपास सुरू आहे. या घटनेचा तपास सीआयडीकडून करण्यात येत आहे. मात्र, राजकीय नेत्यांकडून केल्या जाणाऱ्या विधानांमुळे जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होत आहे.

## विलीनीकरण करायचे...

विलीनीकरण होणार का? या प्रश्नावर उत्तर देताना भुजबळ यांनी सत्तेचे समीकरण स्पष्ट केले. ते म्हणाले की, आम्ही सध्या महायुतीचे घटक आहोत. जर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत काही निर्णय घ्यायचा असेल, तर तो आम्हाला भाजपला विचारल्याशिवाय घेता येणार नाही. कोणाला सोबत घ्यायचे आणि कोणाला नाही, याबाबत भाजपच्या ज्येष्ठ मंडळींशी चर्चा करणे अनिवार्य आहे. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावीच लागेल– भुजबळ यांनी पुढे स्पष्ट केले की, ज्यांच्यासोबत आपण सरकारमध्ये आहोत, त्यांना अंधारात ठेवून कोणताही निर्णय घेता येणार नाही. आम्ही सत्तेत आहोत, त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप नेतृत्वाचा सल्ला घेणे ही राजकीय शिष्टाचाराची गोष्ट आहे. विलीनीकरणाबाबत माझ्याकडे कोणतीही कल्पना नाही किंवा तशी कोणतीही चर्चा अद्याप झालेली नाही, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

ठाकरे बंधूंसारखे पवार एकत्र यावे ही इच्छा, पण...– राजकारणात अलीकडेच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आल्याच्या पार्श्वभूमीवर भुजबळ म्हणाले की, जसे दोन्ही ठाकरे एकत्र आले, तसे दोन्ही पवार एकत्र यावे ही भावना असू शकते. मात्र, अजितदादांनी असा कोणताही विचार केल्याचे आम्हाला वाटत नाही. दादांनी भाजपसोबत राहूनच काम करण्याचे ठरवले होते. जर सरकारमधून बाहेर पडायचे असेल किंवा एनडीए (छऊ-) सोडायची असेल तर गोष्टी वेगळ्या असतात, पण दादांच्या मनात तसे काही नव्हते. अजितदादांनंतर आता नेतृत्व कोणाचे?– अजित पवारांच्या पश्चात पक्षाच्या नेतृत्वाबाबत बोलताना भुजबळ यांनी काही महत्त्वाचे संकेत दिले, भुजबळ यांनी सुचवले की, आगामी काळातील राजकीय निर्णयांबाबत सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा केली जाईल. आम्ही उपमुख्यमंत्र्यांची निवड केली आहे, आता त्यांच्या नेतृत्वात चर्चा होतील. राजकारणात काही गोष्टी लगेच घडतात, तर काही गोष्टींना वेळ लागतो, असे म्हणत त्यांनी घाई करण्याची गरज नसल्याचे सांगितले.

## अजितदादांच्या अंत्यसंस्कारावेळी.....

प्रश्न उपस्थित केले आहेत. कडक बंदोबस्त असूनही चोरी, आरोपी ताब्यात : अंत्यविधीच्या पार्श्वभूमीवर बारामती शहरात जवळपास ८ हजार पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवले जात असतानाही चोरट्यांनी मोठ्या प्रमाणावर चोरी केल्याने पोलिस यंत्रणेची परीक्षा झाल्याचं चित्र आहे. मात्र, गर्दीत काही संशयितांना नागरिकांनी सतर्कतेने पकडून त्यांना मारहाण करत पोलिसांच्या स्वाधीन केल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेनंतर पीडितांनी बारामती तालुका पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या असून, पोलिसांनी मोहम्मद युनूस , राजकुमार आठवले, एजाज मिरावले, मोहम्मद सिराज आणि बाळू बोत्रे यांच्यासह अन्य दोन साथीदारांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. सध्या आरोपींची कसून चौकशी सुरू असून, या चोरीमागे आंतरराज्यीय टोळीचा हात असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा संवेदनशील प्रसंगी घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण बारामतीत संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, चोरी गेलेला ऐवज लवकरात लवकर परत मिळावा आणि मुख्य सूत्रधारांना अटक व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## बीड शहर हादरले ;...

घबराट पसरली. अनेक विद्यार्थ्यांनी महाविद्यालय प्रशासनाने सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, संबंधित विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करावी तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शिस्तीचे नियम कडक करावेत, अशी मागणी केली आहे. महाविद्यालय प्रशासनानेही या घटनेकडे गांभीर्याने पाहत अंतर्गत चौकशी सुरू केली असून शिस्तभंगाच्या कारवाईचे संकेत दिले आहेत.

## शिवाजीनगर पोलिस....

त्यामुळे पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांचा आधार घेऊन तरुणीला विश्वासात घेऊन पुन्हा विचारपूस केली. अखेर तिने हा सर्व प्रकार काल्पनिक असल्याचे कबूल केले. तिने जबाबात सांगितले की, काही दिवसांपूर्वी मी मालेगाव येथे एका पाच वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार झाल्याची बातमी वाचली होती. घरी जाताना माझ्या डोक्यात सतत त्याच बातमीचा विचार सुरू होता. मी घरी गेल्यावर रडत रडत घरच्यांना खोटेच सांगितले की, माझ्यासोबत असे घडले आहे. माझ्या रडण्यामुळे घरच्यांचाही विश्वास बसला आणि प्रकरण पोलिसांपर्यंत गेले. त्यानंतर तिने ही सर्व स्टोरी रचल्याचे उघड झाले. अखेर सत्य समोर आल्याने पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ तपास केल्याने रिक्षाचालकावर खोटा गुन्हा दाखल होण्यापासून सुटका मिळाली. या तपासात प्रामुख्याने पो.रवी आघाव यांनी सखोल तपास व चौकशी करून सत्य समोर आणले.

## कारच्या धडकेत...

६९३१) निघाले होते. केज – अंबाजोगाई रस्त्यावर ढाकेफळ शिवारातील कारभारी हॉटेलसमोर अंबाजोगाई येथून अहिल्यानगरकडे जात असलेल्या भरधाव कारने (एम. एच. १६ डीसी ८८४७) त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात चंद्रकांत इंगळे हे जागीच ठार झाले. उत्तरीय तपासणीसाठी त्यांचा मृतदेह केज येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भावजयी, दोन पुतणे असा परिवार आहे. दहा वर्षांपूर्वी त्यांच्या भावाचा अपघातात मृत्यू– दहा वर्षांपूर्वी झालेल्या दुचाकीच्या अपघातातच चंद्रकांत इंगळे यांचा भाऊ शिवशंकर शहाजी इंगळे यांचा मृत्यू झाला होता. रविवारी चंद्रकांत इंगळे यांचा ही अपघातातच मृत्यू झाला.

◆ पान १ वरून पुढे...

## सोमेश्वर मंदिर...

मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांच्या शुभहस्ते आरती संपन्न झाली यावेळी नागोराव काकडे प्रधान पवार पांडुरंग मामा जानवळे पत्रकार संजय देवा कुलकर्णी ज्ञानेश्वर बाबासाहेब शिंदे एडवोकेट धनंजय दबडे प्रवीण चव्हाण हजारे मामा भागवत वैद्य आत्माराम वळकर राजेश अडागळे सुरवसे साहेब गणेश गरड बाबासाहेब शिंदे अलकाबाई डावकर गरड मॅडम गव्हाणे मामा आणि वाचक सूचक रामायण प्रेमी इत्यादींनी यावेळी या कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवून महाप्रसादाने या रामायण वाचण्याची सांगता संपन्न झाली असे संस्थेच्या वतीने प्रसिद्धी माध्यमाद्वारे कळवलेले आहे यावेळी नगरसेवक गोविंद नवनाथ शिराळे हनुमंत गायकवाड इत्यादींनी आभार व्यक्त केले मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.

## गटसचिव श्रीधरराव...

या ठिकाणी यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कातळे साहेब साह्यक निबंधक,एम आर गव्हाणे शाखाधिकारी,रमेशराव साखरे चेअरमन तांदळवाडी,लक्ष्मणराव काळे चेअरमन धुनकवाड,शाहुराव साखरे,माजी चेअरमन वसंत शिक्षक सहकारी संस्था,संजय आबा चव्हाण चेअरमन चोरंबा,बाबुराव भोसले माजी,सरपंच धुनकवाड,तडसकर साहेब लिपीक सा नि धारुर,गटसचिव श्रीकृष्ण चोले,आशोक रंदवे, विष्णु रंदवे, भारत जाधव केज, संतोष लोंढे केज,आर्जुन मुंडे, विष्णु पांचाळ, दिनेश गायकवाड, रमेश वाघमोडे, दत्ता मंदे, विष्णु शेरकर, रमेश वाघमोडे, नामदेव मोरे, विजयकुमार करपे,सुरेश गिलबिले, स्वामी साहेब यांच्यासह सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते त्यांनी सेवापुर्ती निमित्त गटसचिव श्रीधरराव अंडील यांना शुभेच्छा दिल्या.

## तलवाडा येथील...

केली असून, जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. परदेशातून एमबीबीएस ही वैद्यकीय पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीची पात्रता परीक्षा भारतामध्ये डॉक्टर म्हणून नोंदणी मिळवण्यासह प्रॅक्टिससाठी आवश्यक असते. डॉ. शेख ताहा यांच्या या यशाबद्दल पोलीस प्रशिक्षण केंद्रात केंद्राचे प्राचार्य अशोक बनकर, उपप्राचार्य विलास पाटील यांच्या हस्ते सत्कार पुष्पगुच्छ आणि शाल देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी आपल्या मुलाच्या यशाचे कौतुक पाहून डॉ. ताहा यांचे वडील शेख एजाज आणि आई अमिना बेगम यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले होते. यावेळी अशोक बनकर आणि विलास पाटील यांनी डॉ. ताहा यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देताना, हा केवळ शेख कुटुंबाचा नाही, तर संपूर्ण तलवाडा गाव व जालना जिल्ह्याचा अभिमान आहे, अशा भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला शेख कुटुंबातील सदस्य, मित्रपरिवार आणि नॅशनलनगरमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एका सामान्य कुटुंबातून येऊन, देशपातळीवरील परीक्षेत यश मिळवून डॉ. ताहा यांनी समाजासमोर एक नवीन आदर्श उभा केला आहे डॉ. शेख ताह यांच्या या सुवर्ण दिपक यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दैनिक मराठवाडा पत्र परिवाराच्या वतीने डॉ. शेख ताह यांना पुढिल वाटचालीसाठी खुप खुप मनस्वी हार्दिक हार्दिक शुभेच्छा!

## आई - वडिलांचे...

वडिलांचे आणि महाविद्यालयाचे नाव मोठे होईल असे प्रतिपादन बारावी विद्यार्थ्याच्या निरोप समारोह कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ड सुरेशराव हात्ते यांनी केले यावेळी व्यासपीठावर

◆ पान १ वरून पुढे...

तलवाडा पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक कैलास अन्नलदास, अट्टल महाविद्यालयाचे प्राध्यापक शरद सदाफुले, माजी सरपंच राधाकिसन शिंगणे, डॉ. नितीन काकड यांच्या सह मान्यवर उपस्थित होते. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील त्वरितापुरी कला व विज्ञान महाविद्यालय येथील बारावी वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्यासाठी निरोप समारोह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्या येणाऱ्या काळात त्यांना शैक्षणिक क्षेत्रात यश मिळावे अशा शुभेच्या आपल्या मनोगतातून पोलिस उपनिरीक्षक कैलास अन्लादास, प्राध्यापक शरद सदाफुले, डॉ.धुमक, पत्रकार तुळशीराम वाघमारे, पत्रकार आर आर बहिर यांनी दिल्या.यावेळी पुढे ॲड हात्ते म्हणाले की बारावी परीक्षेचा काळ हा सर्वात कठीण परंतु तितकाच आयुष्याला कलाटणी देणारा काळ मानला जातो. या कालावधीत विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न केले पाहिजे. आपल्या आई वडिलांचे नाव मोठे होईल यासाठी मेहनत घेतली पाहिजे.आणि आपले जीवन सुखकर कसे होईल याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सगुण सर्व विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य शेख खालीलभाई, पत्रकार विष्णु राठोड,खातिब कादिर, बाबुराव शिंगणे, नन्नवरे, प्राध्यापक भारत चव्हाण, चोरमोले,मदन पवार, विजय हातागळे यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडवणीचे धस...

दौरे वेगवेगळ्या एजन्सीच्या माध्यमातून त्यांनी केलेले आहेत तसेच त्यांनी आपल्या आई–वडिलांनाही जवळपास ०८ देशांचे दौऱ्यावर पाठवले होते आज दि.०१ /०२ /२०२६ रोजी मुंबई येथील इंटरनॅशनल एअरपोर्ट वरून श्री. मधुकररावजी धस गुरुजी व त्यांच्या सौभाग्यवती जिजाबाई मधुकर धस हे धस दांपत्ये दोहा या कतार देशाच्या राजधानीसाठी रवाना झाले आहेत व पुढील ०५ दिवस ते तेथील वेगवेगळ्या पर्यटन स्थळाला भेटी देणार आहेत या दौऱ्यासाठी त्यांना माजी आमदार केशवराव आंधळे तसेच नातेवाईक, मित्रमंडळी ,पत्रकार ,कुटुंबाच्या वतीने आनंददायी आणि सुखाच्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ईगलवूड शाळेचे...

पाठक, श्री.सुहास बोराडे, श्री.अन्वर शेख आदी मान्यवर उपस्थित होते. दोन्ही दिवशी मान्यवर पाहुण्यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांमधील संस्कार, शिस्त व आत्मविश्वासाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पहिल्या दिवशी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.गुंजन जोशी आणि आर्या खुळे आणि इतर विद्यार्थ्यांनी तर दुसऱ्या दिवशी काळे वरद आणि गायकवाड यशश्री व इतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक विभाग प्रमुख अर्जुन तौर सर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत प्रभावीपणे केले. दोन्ही दिवशी शाळेच्या वार्षिक कामकाजाचा आढावा प्राचार्य सत्यजित कांजाळकर व उपप्राचार्य प्रणिता कांजाळकर यांनी घेतला. संस्थेचे सचिव डॉ.शरद पवार यांनी शाळेच्या विकासात्मक वाटचालीचे कौतुक केले.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विविध गीतांवर आधारित समूह नृत्य व लोकनृत्यांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.अर्चना पवार, शाळा व्यवस्थापन, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## श्री नारायण विद्यालयातील...

◆ पान १ वरून पुढे...

म्हणून कार्य करत होते. यावेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयाचे प्राचार्य तथा सचिव श्री अमोल काळे सर म्हणाले की चव्हाण सर यांचा सांस्कृतिक कार्यक्रमात तसेच शैक्षणिक कार्यक्रमात बहुमूल्य असे योगदान होते. त्यांनी कवायत, लेझीम, टिपर्या, योग विद्यार्थ्यांना सहजपणे शिकवले. विज्ञान आणि इंग्लिश विषयामध्ये विद्यार्थ्यांना परिपूर्ण असे ज्ञान दिले. यावेळी

प्राध्यापक अशोक घरत सर म्हणाले की चव्हाण सर यांचा स्वभाव मनमोकळा आणि प्रत्येकाला आपुलकीने बोलणारे होते. एक आदर्श शिक्षक होते. विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. चव्हाण सरांनी प्रत्येक काम जिद्द, चिकाटीने आणि मेहनतीने केले. प्रत्येक गोष्ट मनापासून करायची हा त्यांचा स्वभावच होता.

तसेच प्राध्यापक दुबाले जे. स, श्री अनिल जाधवर सर, करपे सर, शेख सर,इनकर सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मस्के सर यांनी केले तर आभार प्रदर्शन शेख सर यांनी मानले. कार्यक्रमाला चव्हाण सर यांची मुले डॉक्टर महेश चव्हाण, डॉक्टर ओंकार चव्हाण तसेच श्री नारायण विद्यालयातील सर्व शिक्षक कर्मचारी यावेळी उपस्थित होते. यामध्ये प्रा.पौळ डी.बी,श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी, प्रा.मुरमुडे ए .एन , रकटे बी.आर , प्रा. रकटे पी. आर., श्रीमती काळे मॅडम, श्रीमती भुतावळे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम, श्रीमती जगताप मॅडम इत्यादी उपस्थित होते.

## बीड जिल्हा ...

पत्रकार संघाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सौ सुनंदाताई केदार यांनी लोकरत्न पुरस्कार देऊन जाधवर साहेब यांना सन्मानित केले व त्यांच्या उत्कृष्ट पोलीस प्रशासकीय कर्तव्याबाबत समाधान व्यक्त करून त्यांना पुढील उत्कृष्ट पोलीस कर्तव्यासाठी सर्व उपस्थितांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी उपस्थित असलेले बीड शहर वाहतूक शाखेचे कर्मचारी मुंडे साहेब शिंदे साहेब गाडे साहेब शेख मॅडम तसेच लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम जी वावळकर साहेब लोक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे साहेब तसेच पाटील साहेब व बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह कुकडगाव चे पत्रकार पकु देवा गाडे टिकू देवा कुलकर्णी सह सर्व लोकशाही पत्रकार संघाची सर्व टीम उपस्थित होती.

## छत्रपती शिवरायांचा....

कार्यकारी संचालक संकेत मोदी, मार्गदर्शक वसंतराव चव्हाण, डॉ.डी. एच.थोरात, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नवनाथ घुगे, डॉ.विश्वजीत पवार, श्रीमती सविता बनाळे, संतोष पवार, सौ.डिंपल संकेत मोदी, डॉ.मनिषा पवार, सौ.सुनिता मोदी, शाळेचे प्राचार्य एन.प्रशांत कुमार, विद्यार्थी प्रतिनिधी शिवेंद्रसिंह कणसे, विद्यार्थीनी प्रतिनिधी आरोही पवार यांच्या शुभहस्ते मूर्तीपूजन आणि दीपप्रज्ज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार, पुष्पांजली अर्पण व दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. स्नेहसंमेलनात वार्षिक अहवाल सादर करताना शाळेचे प्राचार्य एन.प्रशांत कुमार यांनी सांगितले की, न्यू व्हिजन पब्लिक स्कूल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी संपूर्ण शैक्षणिक वर्षात स्पर्धा परीक्षा, संशोधन, स्वयं अध्ययन, मैदानी स्पर्धा, प्रकल्पांना क्षेत्र भेट, विविध दिन साजरे करणे इत्यादी उपक्रम राबविते. सोबतच सांस्कृतिक उपक्रमाला प्रोत्साहन देते. न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुसज्ज व प्रशस्त संगणक लॅबच्या द्वारे डिजिटल शिक्षण, सायन्स,

◆ पान १ वरून पुढे...

टेक्नॉलॉजीचे अद्ययावत ज्ञान दिले जाते, संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी व सौ.डिंपल संकेत मोदी यांच्या मार्गदर्शनानुसार न्यु व्हिजन पब्लिक स्कूलमध्ये सर्व शैक्षणिक साहित्य, सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नवनव्या संकल्पना राबविण्यात येत आहेत. पालक–विद्यार्थी मेळावा, विज्ञान प्रदर्शन, भव्य क्रीडांगणावर क्रीडा महोत्सव यातून युकेजी, युकेजी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देत आहोत. वार्षिक शैक्षणिक प्रगती तसेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा क्षेत्रातील विशेष प्रगती या बाबतीत माहिती स्क्रीन द्वारे देवून आगामी काळात ही संस्था पालकांचा विश्वास सार्थ ठरवेल अशी ग्वाही प्राचार्य एन.प्रशांत कुमार यांनी दिली. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अनम शेख व अर्पिता दरगड या विद्यार्थीनींनी केले. यंदाच्या स्नेहसंमेलनाची थीम छत्रपती स्वराज्याचे शिल्पकार अशी होती. पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेत स्नेहसंमेलनात नाट्यप्रयोग, नृत्याचे व सांस्कृतिक कलेचे सादरीकरण केले. यावेळी उत्साहवर्धक आणि आई भवानी मातेची पारंपारीक गीतं सादर केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, अष्टप्रधानमंडळ, मावळे यांची शिवकालीन वेशभूषा साकारून शिवरायांच्या पराक्रमाचे आणि स्वराज्यनिर्मितीच्या प्रेरणादायी इतिहासाचे सजीव दर्शन घडविले. कार्यक्रमात राजमाता माँसाहेब जिजाऊ यांनी केलेल्या संस्कारांमुळे घडलेले शिवाजी महाराज या विषयावर विशेष सादरीकरण करण्यात आले. राजमाता जिजाऊंनी शिवरायांवर रूजविलेला स्वाभिमान, मातृभूमी प्रेम, अन्यायाविरूद्ध लढण्याची वृत्ती व उत्तम नेतृत्वगुण यांचा प्रभावी उलगडा या सादरीकरणातून करण्यात आला. राजमाता जिजाऊंच्या संस्कारांतून घडलेले शिवराय हेच स्वराज्याच्या स्थापनेचे शिल्पकार ठरले, असा प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांनी भव्य दिव्य व्यासपीठावर कलात्मक सादरीकरणातून दिला. यावेळी शिवकालीन आकर्षक सजावट, देखावा तयार करण्यात आला होता. या उपकृमातून न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, अंबाजोगाई या शाळेने विद्यार्थ्यांमध्ये स्वाभिमान नेतृत्व क्षमता या मूल्यांचा विकास करणारा योग्य तो धडा देण्यात आला. संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या अभिनव अशा संकल्पनेतून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण देणे आणि त्यांना संस्कारशील बनवणे या हेतूने ही थीम ठेवण्यात. पापा मोदी हे सतत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणारे शिक्षक यांच्या माध्यमातून विविध शैक्षणिक संकल्पना राबवितात. मागील वीस वर्षांपासूनची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम आहे. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थित मान्यवर, पालक व नागरिकांकडून मोठ्या टाळ्यांची उत्स्फूर्त दाद मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनाने परिसरात देशभक्ती, संस्कार आणि संस्कृतीप्रेमाचे प्रेरणादायी वातावरण निर्माण केले. प्रारंभी प्रास्ताविक हेडबॉय शिवेंद्रसिंह कणसे याने केले. याप्रसंगी अंबाजोगाई नगरपालिकेचे नगरसेवक महेश कदम, नगरसेवक प्रतिनिधी सचिन जाधव, दत्तात्रय सरवदे, माजी नगरसेवक राजेंद्र मोरे, टि.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य एल.व्ही.बगले, अभियांत्रिकी महाविद्यालयातील विभागप्रमुख डॉ.विवेकानंद राजमान्य, प्रा.सुरेश बिराजदार, ॲड.दयानंद लोंढाळ, डॉ.संदीप थोरात, माजी प्राचार्य सि.व्ही. गायकवाड, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, पत्रकार प्रशांत लाटकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, माता – पिता पालक, ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी आणि युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या यशस्वितेसाठी न्यु व्हिजन पब्लिक स्कूल व टोडलर्स व्हिले प्री–स्कुल यांच्या सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बालसाहित्याकडे द्या विशेष लक्ष; जिल्हाधिकाऱ्यांची साहित्यिकांना साद

## भरपूर वाचनानंतरच लेखनाकडे वळावे: संमेलनाध्यक्ष डॉ. विशाल तायडे

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

साहित्य हे मानवी जीवनाला आकार देणारे प्रभावी माध्यम आहे. समाजातील दोषांवर प्रहार करत विकृत प्रवृत्तींना वठणीवर आणण्याचे कार्य साहित्य करते. मात्र या समग्र साहित्याचा खरा पाया म्हणजे बालसाहित्य होय. त्यामुळे बालसाहित्याकडे विशेष लक्ष देणे हे प्रत्येक साहित्यिकाचे आद्यकर्तव्य आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. जैन इंटरनॅशनल स्कूल, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पहिल्या जिल्हा बालसाहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी साने गुरुजींचा संदर्भ देत सांगितले की, साने गुरुजी समजून घ्यायचे असतील तर साने गुरुजींच्या आईच्या भूमिकेतून पाहावे लागते. आईला बाळाच्या मनाची, त्याच्या हृदयाची खोल जाण असते. त्या हृदयाला स्पर्श करून साहित्यिकांनी नवनवीन साहित्यकृती निर्माण कराव्यात, असे भावपूर्ण आवाहनही त्यांनी केले. संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ बालसाहित्यिक डॉ. विशाल तायडे



यांनी मुलांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्याची गरज अधोरेखित केली. मुलं वाचती होण्यासाठी शिक्षक आणि पालकांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच लेखकांनी लिहिण्यापूर्वी भरपूर वाचन केले पाहिजे. सखोल वाचनानंतरच लेखनाला सुरुवात करावी, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. या संमेलनात विद्यार्थ्यांनी कथाकथन, नाट्यछटा, वाद-विवाद तसेच कवी संमेलनाच्या माध्यमातून आपली साहित्यिक व कलात्मक प्रतिभा सादर केली. या प्रतिभेच्या बळावर केवळ विद्यार्थ्यांचेच नव्हे, तर देशाचेही भविष्य उज्ज्वल होईल, असाआशावादी सूर उपस्थित साहित्यिकांमधून व्यक्त झाला. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष तथा शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर-पानसरे यांनी शिक्षकांसोबतच विद्यार्थ्यांसाठीही साहित्य संमेलनाची चळवळ अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. संमेलनाची सुरुवात पारंपरिक ग्रंथदिंडीने करण्यात आली. वारकरी संप्रदायाच्या पारंपरिक वेशभूषेतील सहभागींनी ग्रंथदिंडीला विशेष शोभा आणली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित साहेब यांनीही मार्गदर्शन केले. संमेलनास प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या संचालिका शैलजा दराडे, डायटचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. सुनीता राठोड, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कथाकथन सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. हबीब भंडारे होते. उपशिक्षणाधिकारी दीपाली थावरे व शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप चौरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### ● जिल्हाधिकारी रमले बालकलावंतात

**जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी प्रेक्षकात बसलेल्या वारकरी वेशभुषेतील बालकाला आपल्या जवळ बोलावून व्यासपीठावर आपल्या शेजारी बसविले. त्यानंतर एका बालकलाकाराच्या आग्रहास्तव भजनही गायले.**

## महामानव अभिवादन ग्रुप कडून १०६ वा मूकनायक वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



महामानव अभिवादन ग्रुप व महामानव सार्वजनिक वाचनालय बीड च्या वतीने १०६ वा मूकनायक दिन तुलसी संगणक, व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे बीड शहरातील वर्तमानपत्रांचे संपादक व पत्रकारांचा सम्मान करून संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त सी.ई.ओ.मा. पी.व्ही बनसोडे, प्रमुख पाहुणे दै. पार्श्वभूमीचे संपादक मा.गंमतभाऊ भंडारी, दैनिक समर्थ राजयोग चे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ संपर्क प्रमुख मा. वैभव स्वामी,जिल्हा कृषी अधिक्षक मा.सुभाष साळवे, मा.प्राचार्य डी.जी. निकाळजे, मा. प्रा.डॉ.उत्तमराव साळवे, मा. अशोक वाणी उपसंपादक दै. झुंजार नेता, मा.सुनील डोंगरे उपसंपादक दैनिक पुण्यभूमी, मा.प्रदीप कांबळे उपसंपादक दिव्य मराठी, मा.प्रशांत वासनिक मा. नितीन मुजमुले संपादक दै. प्रवक्ता लोकशाहीचा, मा. शेखर कुमार संपादक वादळ, मा.प्रा.गजानन चित्रे,कास्टाईब जिल्हाध्यक्ष सुमेध जोगदंड,पत्रकार आनंद वीर,यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्प माला व दीप प्रज्वलीत करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री बीड चे पालकमंत्री दिवंगत अजित दादा पवार यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष आयु. गुलाब भोले यांनी केले. मुकनायक दिना बद्दल प्रो. डॉ. मनोहर सीरसाट आपल्या मनोगतात म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता मुकानायक नावाचे दैनिक स्थापन करून त्यामध्ये दीन,दलित, दुबळे यांचा आवाज सर्वांपर्यंत पोहोचन्याकरिता स्वातंत्र्य,समता, व न्याया करिता व तसेच आत्म सन्माना करिता केलेली पत्रकारिता होय हे अनेक उदाहरना द्वारे स्पष्ट केले.या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे अध्यक्ष आयु डी. जी. वानखेडे मुक्त पत्रकार व वाचन संस्कृती वाढवण्याकरिता ४४ मोफत वाचनालय स्थपण करून वाचन संस्कृती वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्ना करिता २०२६ चा मुकनायक पुरस्कार सन्मानपत्र देऊन त्यांचा यथोचित सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष पी व्ही. बनसोडे साहेब, वैभव स्वामी व विचारपिठा वरील मान्यवारांच्या हस्ते करण्यात आला.या प्रसंगी जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे साहेब, प्रा.डॉ. ऊत्तम साळवे, दै.समर्थ राजयोग चे संपादक मा. वैभव स्वामी, वादळ चे संपादक शेखर कुमार, दिव्य मराठी चे उप संपादक प्रदीप कांबळे यांनी मुकानायक दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले तर प्रमुख पाहुणे दै. पार्शवभूमी चे संपादक गंमभाऊ भंडारी, यांनी मुकनायक दिना निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थपण केलेल्या मुकनायक वर्तमान

## युकेजीचा शौर्य डोंगरे रौप्य पदकाने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व कलात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धांमध्ये इयत्ता युकेजीमध्ये शिक्षण घेत असलेला शौर्य सुनिल डोंगरे याने उल्लेखनीय कामगिरी करत रौप्य पदक पटकावले. लहान वयातच शौर्यने दाखवलेल्या आत्मविश्वासपूर्ण सहभागामुळे शिक्षक व पालकांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या यशाबद्दल शौर्यचा शाळेच्या प्रिन्सिपल उमा जगतकर यांच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना प्रिन्सिपल जगतकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धा अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. शाळेचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांच्या संकल्पनेतून प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, आत्मविश्वास व सर्जनशीलता वाढावी, या उद्देशाने हे उपक्रम आयोजित करण्यात आले होते. दरम्यान, युकेजी वर्गाच्या वर्गशिक्षिका फातिमा शाह यांनी विशेष लक्ष देत आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना स्पर्धांसाठी तयार केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी निर्भीडपणे स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. शौर्यच्या या यशाबद्दल पालक, शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापनाकडून त्याचे अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## सौ. के.एस.के. महाविद्यालयातील आधुनिक रेकॉर्ड रुमला संस्थेच्या सहसचिव डॉ. सौ. दीपाताई क्षीरसागर यांची भेट



**बीड । प्रतिनिधी**

सौ. के. एस. के. महाविद्यालयात डिजीटल दस्तऐवज व्यवस्थापनावर आधारित उभारण्यात आलेल्या आधुनिक रेकॉर्ड रुमला नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. सौ. दीपाताई क्षीरसागर यांनी भेट देऊन पाहणी केली. डेटा सुरक्षितता, दस्तऐवजांचे केंद्रीकृत डिजिटायझेशन व प्रशासकीय प्रक्रीयेची अचुकता वाढविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या सुविधांची त्यांनी माहिती घेतली. रेकॉर्ड रुमचे व्यवस्थापक श्री. नवनाथ कातखडे यांनी रुमची रचना, तांत्रिक व्यवस्था, डिजीटल आर्काइव्हिंग प्रक्रिया आणि सुरक्षा प्रणाली यांचा सविस्तर आढावा सादर केला. त्यांनी दस्तऐवजांची वर्गीकरण, स्कॅनिंग आणि संग्रहन यासाठी वापरल्या जाणार्या प्रक्रियांची माहितीही दिली. या भिटीदरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. आधुनिक रेकॉर्ड रुममुळे महाविद्यालयाच्या दस्तऐवजीकरण व्यवस्थेत गती, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. याभेटी दरम्यान संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वांभर देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक डॉ. जालिंदर कोळेकर तसेच सर्व विभाग प्रमुख व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या पाठपुराव्याला मोठे यश! नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतील रेशीम उद्योजक शेतकऱ्यांच्या अनुदानात वाढ

**सिरसाळा । प्रतिनिधी**


नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना टप्पा क्रमांक २ मध्ये रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी राज्य शासनाला काही दिवसांपूर्वी पत्र दिले होते. ज्यामध्ये शासनाने शेतकऱ्यांच्या अनुदानात वाढ करावी अशी विनंती केली होती. पोखरा विभागाने संबंधित विभागाने रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या अनुदानात २.२० लाखांवरून ३.२५ लाख एवढी वाढ करण्यात आली आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, राज्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या वतीने पोखरा योजनेच्या अंतर्गत २.२० एवढे अनुदान देण्यात येत होते. ज्यामध्ये शेतकऱ्यांना पूर्व मशागत, तुती रोपांची लागवड, संगोपन, शेडची उभारणी, अळ्यांचे संगोपन करणे अशी सर्वच कामे करावी लागत. सदरील अनुदान अत्यंत तोकडे पडत होते, ज्यामुळे त्यातून किमान खर्चही होणे शक्य नव्हते. सदरील बाब लक्षात घेता रेशीम उत्पादक शेतकऱ्यांनी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्याकडे काही महत्त्वपूर्ण गरजा व्यक्त केल्या होत्या.

## बीड येथे श्री गजानन महाराजांचा १४८ वा प्रकट दिन व रौप्य महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ

**बीड । प्रतिनिधी**



श्री क्षेत्र शेगाव निवासी संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रकट दिनानिमित्त तसेच श्री गजानन महाराज मंदिर, एकनाथ नगर, बीड येथे मंदिर व मूर्ती स्थापनेस २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने मंदिरात रौप्य महोत्सव वर्ष साजरे होत आहे दि. १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा व श्री गजानन विजयग्रंथ पारायण आयोजित करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा शुभारंभ रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी झालाअसून सांगता रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होईल. दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत श्री गजानन विजयग्रंथ पारायण तर दुपारी २ ते ५ या वेळेत श्रीमद् भागवत कथा होणार आहे. या कथांचे प्रवक्ते भागवताचार्य ह.भ.प. अंगद महाराज सातपुते (बीड) हे करणार आहेत.

श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन माघ शुद्ध सप्तमी, शके १९४७, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी असून त्या दिवशी विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ वाजता श्रींचा अभिषेक, सकाळी १० वाजता भागवताचा गोकर्ण अध्याय, दुपारी १२ वाजता श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन सोहळा व महाआरती संपन्न होणार आहे. दुपारी १ वाजता श्रींची पालखी मिरवणूक भक्ती कन्स्ट्रक्शन परिसरातून काढण्यात येणार असून त्यानंतर लगेचच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.


दैनिक मराठवाडा पत्र

**टी.सी. हरवला आहे.**

**रंजना सोपान घरत या नावाचा इयत्ता १२ वी विज्ञान पास चा टी. सी खर्डा ते वाशी या प्रवासामध्ये हरवला आहे. कोणाला सापडल्यास... संपर्क मो.नं. ८२०८१ १०९०३ साधावा.**



### जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी गेवराई यांचे न्यायालयात**
**अर्जदार- अशोकराव विठ्ठलराव दुधसागर,**
**रा. मालेगांव बु'' ता.गेवराई जि. बीड**

यांचा अर्ज दि. १०.११.२०२५ अर्जदार श्री. अशोकराव विठ्ठलराव दुधसागर, रा. मालेगांव बु'' ता.गेवराई जि. बीड यांनी त्यांचा मुलगा करण अशोकराव दुधसागर यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती/ या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

प्रमाणपत्र धारकाचे नाव मौ. मालेगाव बु'' ता. गेवराई जि.बीड या ठिकाणी दि. १४.०१.२००६ रोजी जन्म झाला असुन जन्म नोंद प्रमाणपत्र मिळणेसंबंधी तालुका दंडाधिकारी गेवराई यांनी दि. १०.११.२०२५ रोजी जाहिर प्रगटन दिलेले आहे. संबंधीत यांचा जन्म मौ. मालेगाव बु'' येथे झाला आहे का? याबाबत शासन निर्णय क्रं. जन्म/मृत्यू नोंद २५२५/ई.ओ ९९११८१/प्र.क्र.-२२ कु क. नवीन मंत्रालय, मुंबई दि. १२/३/२०२५ नुसार सदरहु जन्म मौ. मालेगाव बु'' ता. गेवराई येथे झालेला आहे. जन्म येथे झालेला आहे किंवा नाही असे कोणाचे म्हणने असेल वरील जन्मबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का
(स्वाक्षरीत)
कार्यकारी दंडाधिकारी, गेवराई



### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७९०/२०२६**
**कुशिवर्ता व इतर वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः (१) कुशिवर्ता भ्र. निवासराव उर्फ नेवासराव सारुक, वय- ५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. च-हाटा, ता. जि. बीड २) संदिप पि. निवासराव उर्फ नेवासराव सारुक, वय-२६ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर. ३) प्रदिप पि. निवासराव उर्फ नेवसराव सारुक . वय-२५ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर ४) संगम पि. निवासराव उर्फ नेवसराव सारुक, वय-१९ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर ५) गणपती पि. साहेबा सारुक, वय-८० वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे निवासराव उर्फ नेवासराव पि.गणपती सारुक हे दिनांक ३०/०४/२०१३ रोजी मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. ५ हे मयताचे वडील आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे निवासराव उर्फ नेवासराव पि.गणपती सारुक यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत निवासराव उर्फ नेवासराव पि. गणपती सारुक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख २६/०२/२०२६ आहे.**

आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

(विधीज्ञ जी. एम. केकान यांच्यामार्फत)

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

शिक्का
(स्वाक्षरीत)
क. लिपीक



### जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १९७८/२०२५**
**गंगाबाई विरूध्द निरंक**

**अर्जदार - १. गंगाबाई भ्र. बालाप्रसाद कासट, वय - ५८ वर्षे, धंदा- घरकाम, रा. विप्रनगर, ब्राम्हणवाडी, बीड ता.जि. बीड. २. दिपक पि. बालाप्रसाद कासाट, वय- ३७ वर्षे, धंदा अकाउंटट, रा. सदर, ३. सोनाली भ्र. हरिभाउ झंवर, वय - ३९ वर्षे, धंदा - घरकाम, रा. आझाद चौक, सेंट्रल हनुमान, लातुर ता.जि. लातुर**

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मदनलाल पि. दगडुलाल कासट यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत मदनलाल पि. दगडुलाल कासट यांचा मृत्यु दिनांक २३/११/२००० रोजी झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ ते ३ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत मदनलाल पि. दगडुलाल कासट यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार क्र. १ ते ३ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मदनलाल पि. दगडुलाल कासट यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २३/०२/२०२६ आहे.**

(ॲड. डि. एम रोटे यांच्यामार्फत)

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

शिक्का
(स्वाक्षरीत)
क. लिपीक



### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७८/२०२६**
**न्याजबी अहमदखॉ पठाण व इतर**

ज्याअर्थी **मयत नामे अहमदखाँ बादशहा पठाण हे/हया दिनांक २६/०७/२०२२ रोजी मौ. महारटाकळी पो. अर्धपिंपरी ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १. न्याजबी अहमदखॉ पठाण, वय ६५ वर्षे धंदा शेती रा. मु. महारटाकळी पो. अर्धपिंपरी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २. शब्बीर अहमदखॉ पठाण, वय ३८ वर्षे धंदा शेती रा. मु. महारटाकळी पो. अर्धपिंपरी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३. जावेद अहमदखॉ पठाण, वय ३६ वर्षे धंदा शेती रा. मु. महारटाकळी पो. अर्धपिंपरी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४. सलीम अहमदखॉ पठाण, वय ३४ वर्षे धंदा शेती रा. रा. मु. महारटाकळी पो. अर्धपिंपरी ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ५. जलील अहमदखॉ पठाण, वय ३५ वर्षे धंदा घरकाम रा. मु. महारटाकळी पो. अर्धपिंपरी ता. गेवराई जि.बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत अहमदखॉ बादशहा पठाण यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ३०/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**पुढील तारीख - १०/०३/२०२५**
**(मार्फत - ॲड आय.बी. नागरे, गेवराई)**

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई

शिक्का
(स्वाक्षरीत)
क. लिपीक



### जाहीर प्रगटन

**मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८०/२०२६**
**रूपाली जोगदंड वि. निल**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. **अर्जदार: १) रूपाली भ्र.अजय जोगदंड, वय: २६ वर्षे, धंदा: घरकाम, रा. चौसाळा ता. जि. बीड. २) अमृता पि. अजय जोगदंड, वय: ०७ वर्षे, धंदा: शिक्षण, रा. वरील प्रमाणे अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ३) वृंदावनी भ्र.मधुकर जोगदंड, वय: ४७ वर्षे, धंदा: घरकाम, रा. वरील प्रमाणे**

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **अजय मधुकर जोगदंड, राहणार चौसाळा ता. जि. बीड हे दिनांक ०४/०१/२०२५ रोजी देशमुख मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल संगमनेर जिल्हा अहिल्यानगर** या ठिकाणी उपचार घेत असताना मृत्यू झाला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही मयताची अज्ञान मुलगी व अर्जदार क्र. ३ ही मयताची आई आहे.

मयत नामे अजय मधुकर जोगदंड, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत अजय मधुकर जोगदंड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **सदर प्रकरणात पुढील तारीख १३/०३/२०२६ आहे.** आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

(विधीज्ञ - श्री. घोडके एस. डी.)

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

शिक्का
(स्वाक्षरीत)
क. लिपीक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. ०३ फेब्रुवारी २०२६ ●

## सोमेश्वर मंदिर येथे आज श्री रामायणातील अरण्यवाचक कांड्या ची महाप्रसादाने मोठ्या उत्साहात भक्तीमय वातावरणात सांगता



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील सर्वच्या नवसाला पावणारे बार्शी रोडवरील श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर येथे सुरू असलेल्या रामायणातील अरण्य कांडातील महाप्रसाधने मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात शेकडो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये सांगता या वेळी बीड शहरातील व पंचक्रोशीतील श्रीराम भक्त हनुमान भक्त सोमेश्वर महादेव भक्त इत्यादी यांनी शेकडोच्या संख्येने उपस्थिती लावून या कार्यक्रमाची शोभा वाढवले व सर्वांनी महाप्रसाद घेतला व कथा श्रवण केली प्रभू रामचंद्र सारखे जीवन सर्वांनी जगायला पाहिजे व प्रभू रामचंद्र यांचा आदर्श आपण डोळ्यासमोर ठेवून पुढे चालायला पाहिजे अशी चर्चाही यावेळी येथे भाविक भक्तांनी केली व महाप्रसादाने या कार्यक्रमाची सांगता संपन्न झाली या वेळी सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा लोकशाही पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशचे प्रदेश उपाध्यक्ष तथा भाजपा नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती ▶▶ उर्वरित पान २ वर

# सहकार अधिकारी २५ हजाराची लाच घेताना पकडला, जालना एसीबीची बीडमध्ये आठवड्यात दुसरी कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

सध्या जालना एसीबी बीड जिल्ह्यात कारवाईचा धडका लावला आहे. आठवड्यात जालना एसीबीने माजलगाव येथील पोलीस कर्मचाऱ्यासह एका खाजगी इसमावर कारवाई केल्यानंतर सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी मोठी कारवाई केली आहे. अंबाजोगाई येथील सहायक निबंधक कार्यालयातील सहकार अधिकारी (वर्ग-३) संतोष भंडारी यांना २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना सोमवारी (दि.२) रंगेहात पकडण्यात आले.

तक्रारदार हे एका पतसंस्थेत सचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या विरोधात निबंधक कार्यालयात काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या चौकशीत मदत करण्यासाठी आणि अहवाल अनुकूल देण्यासाठी संतोष भंडारी यांनी ५० हजार रुपयांची मागणी केली होती. शेवटी २५ हजार रुपये देण्याचे ठरले. मात्र, लाच देण्याऐवजी तक्रारदाराने भ्रष्टाचाराचा हा बुरखा फाडण्याचे ठरवले आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर जालना एसीबीचे उपअधीक्षक जाधवर आणि त्यांच्या पथकाने सोमवारी दुपारी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराने २५ हजार रुपये भंडारी यांना देताच दबा धरून बसलेल्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. या कारवाईमुळे बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. आरोपी भंडारी याला ताब्यात घेण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरु आहे.





*वाकनाथपूर येथील दादासाहेब तुळशीराम खाकरे, दत्ता तुळशीराम खाकरे व ओमकार दादासाहेब खाकरे यांनी भाटसांगवी येथे सुरू केलेल्या बळीराजा कृषी सेवा केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी वसंत महाराज श्री दत्त संस्थान लोळदगाव तसेच योगीराजबाबा श्री क्षेत्र रामगड यांचीही उपस्थिती होती.*

## गटसचिव श्रीधरराव अंडील यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील सेवा सहकारी संस्था मर्यादित तांदळवाडी व धुनकवड या संस्थेचे जेष्ठ सचिव माननीय श्री.श्रीधरराव ज्ञानोबा अंडील हे नियत वयोमानानुसार शनिवार दि.३१/०१/२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत त्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा धारूर या ठिकाणी संपन्न झाला.

धारूर तालुका गटसचिव संघटना व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धारूर यांच्या वतीने त्यांचा सोमवार दि.०२/०२/२०२६ रोजी धारूर या ठिकाणी सन्मान करण्यात आला ते डीसेंबर १९९५ रोजी सेवा सहकारी सोसायटी या संस्थेत गट सचिव या पदावर सेवेत रुजु झाले.बीड जिल्हा देखरेख सहकारी संस्थेच्या आदेशानुसार गट सचिव या पदावर



त्यांची नियुक्ती झाली व त्यांनी प्रदीर्घ अशी ३० वर्षाची सेवा सहकार क्षेत्रामध्ये यशस्वीरित्या पूर्ण केली अतिशय मितभाषी,सर्वांचा आदर करणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. कोणालाही कोणतीही अडचण असली तर ती अडचण सोडवण्यासाठी ते प्रयत्नशील असायचे सर्व सचिवाला बरोबर घेऊन जाण्यासाठी त्यांचा प्रयत्न सदैव असायचा त्यांचं वागणं म्हणजे इतरांना आदर्श घेण्यासारखं व्यक्तिमत्व असुन,त्यांच्या संस्थेचं रेकॉर्ड अतिशय अद्यावत ठेवण्यामध्ये त्यांनी कधीही निष्काळजीपणा केला नाही तसेच त्यांनी काही काळ धारूर तालुका देखरेख सहकारी संस्थेमध्ये सहाय्यक सचिव म्हणूनही काम केले त्या ठिकाणी सुद्धा त्यांनी सचिवांवर अतिशय प्रेम करून चांगले काम करून घेतले आणि तालुका नेहमी कामांमध्ये अग्रेसर कसा राहील हे पाहिलं. त्यांच्या संस्थेवर त्यांची प्रतिमा अतिशय सुंदर अशा प्रकारची राहिली आज त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने दि. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा धारूर ▶▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा येथील डॉ. शेख ताहा यांना वैद्यकीय परीक्षेत सुवर्ण दिपक यश प्राप्त

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील मुळ रहिवाशी, हल्ली जालना शहरात कायम वास्तव्यास आसलेले शेख एजाज शेख आजिमभाई यांचे ध्येय व संस्कार आत्मसात करुन त्यांचा मुलगा डॉ. शेख ताह यांनी जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर डॉ. पेशात सुवर्ण दिपक यश प्राप्त केल्याने डॉ. शेख ताह यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या बाबत अधिक माहिती आशी की जालना येथील नॅशनलनगर येथे वास्तव्यास आसलेले पोलीस विभागातील लिपिक शेख एजाज अजीम यांचे चिरंजीव डॉ. शेख ताहा यांनी परदेशातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, अत्यंत कठीण मानली जाणारी एफएमजीई परीक्षा ३०० पैकी १९० गुण मिळवून यशस्वीपणे उत्तीर्ण ▶▶ उर्वरित पान २ वर

# आई - वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी जिद्दीने यशस्वी व्हा : ॲड सुरेशराव हात्ते

### स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून ध्येय गाठा – उपनिरीक्षक कैलास अन्नलदास त्वरितापुरी कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तलवाडा । प्रतिनिधी**

मेहनत आणि कठीण परिश्रम करून मन लावून अध्ययन करून आल्या जीवनाला यशाच्या शिखरावर नेत आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी जिद्दीने यशस्वी झाले पाहिजे ज्यामुळे आपल्या गावाचे, आई ▶▶ उर्वरित पान २ वर



## वडवणीचे धस दांपत्य विदेश दौऱ्यावर

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील नामांकित असणारे साई आशीर्वाद ट्रेडर्सचे सर्वेसर्वा मालक युवा उद्योजक तथा वडवणी मार्केट कमिटीचे संचालक श्री.रणजीत भैय्या धस यांचे आई-वडील श्री.मधुकररावजी धस गुरुजी व सौ. जिजाबाई मधुकरराव धस हे ( यु.ए.ई.)मधील कतार या देशाला रविवार दि.०१ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथील इंटरनॅशनल एअरपोर्ट वरून रवाना झाले आहेत.सिमेंट उद्योगातील नामांकित कंपनी अल्ट्राटेक सिमेंट यांनी या परदेशी दौऱ्यासाठी त्यांची निवड केली आहे. सविस्तर माहिती अशी की,वडवणी शहरातील सिमेंट व स्टील बांधकाम साहित्यामध्ये प्रसिद्ध असणारे धस कुटुंब विदेशी दौरा करणारे प्रतिष्ठित कुटुंब आहे आतापर्यंत युवा उद्योजक रणजीत भैय्या धस यांनी जवळपास २० देशांचे ▶▶ उर्वरित पान २ वर



## ईगलवूड शाळेचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**माजलगाव । प्रतिनिधी**

ईगलवूड इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ चे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही दिवशी दीपप्रज्वलन व सरस्वती प्रतिमापूजनाने करण्यात आली. पहिल्या दिवशी कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान

डॉ.सुशील भैय्या लोढा यांनी भूषविले तर श्री.दत्ता डाके, श्री.ज्ञानेश्वर मेंडके, मा.खलील पटेल, श्री.हरिभाऊ सोळंके, श्री.अरुण इंगळे, श्री.जुगलकिशोर नावंदर, श्री.सुनील नाना तौर, सौ. रेश्मा मेंडके, श्री. सुरेश एरांडे, श्री.महेंद्र मस्के, श्री.तानाजी सिरसट, श्री.गोविंद इतापे, मा.इम्रान खान, ॲड.काझिम मनसबदार, श्री.पृथ्वीराज तट , अँड.शैलेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. दुसऱ्या दिवशीही विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुण्यांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान डॉ.शरद पवार यांनी भूषवले. तर पाहुणे म्हणून श्री.दीपक जाधव, श्री.राहुल लंगडे, श्री.शरद यादव, सौ. सुचिता होके, सौ.वनिता फुलगे, ॲड.सुलभा देशमुख, श्री.भागवत भोसले, श्री.नितीन काळे, डॉ. शैलेश ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्री नारायण विद्यालयातील सहशिक्षक श्री चव्हाण युवराज सेवानिवृत्त



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ. माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षक श्री चव्हाण युवराज सर सेवानिवृत्त झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे (अण्णा ), प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक मुकुंदराव काळे, प्राचार्य तथा सचिव श्री अमोल काळे सर, अशोकराव पांढरे, श्री विनायक ढास सर, श्रीमती सोजरबाई काळे, सटवाजी कोठुळे ( मेजर), नगरसेवक अक्षय जाधव, डॉक्टर साळवे, फौजी पांडुरंग चव्हाण, श्री दत्ता गोरे, घुगे सर ( उद्योजक), श्री अनिल जाधवर सर हे होते. यावेळी चव्हाण सर यांचा सपत्नीक त्रीकंवर चव्हाण यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा यांनी केला.३० वर्ष शिक्षक ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांना लोक रत्न पुरस्कार देऊन केले सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरास संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांच्या आदेशावरून अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब व पोलीस उपाधीक्षक पूजा पवार मॅडम व बीड जिल्हा वाहतूक शाखेचे सिंगम सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र पेट्रोलिंग करून अनेक बेशिस्त वाहन चालकावर कडक कारवाई करणारे असे दबंग पोलीस उपनिरीक्षक म्हणून ज्यांची



बीड जिल्हा पोलीस दलामध्ये ख्याती आहे असे मा श्री विजय जाधवर साहेब यांना महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघ व श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन च्या वतीने लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले हा सन्मान लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य मुंबई प्रदेशचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांच्या आदेशावरून लोकशाही पत्रकार संघाचे सर्वे सर्व संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब लोकशाही ▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती शिवरायांचा स्वराज्यनिर्मितीच्या प्रेरणादायी इतिहासाचे सजीव दर्शन घडविणारे न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन

### छत्रपती शिवरायांचा स्वराज्यनिर्मितीच्या प्रेरणादायी इतिहासाचे सजीव दर्शन घडविणारे न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन ; इंग्रजी माध्यमाच्या दर्जेदार शिक्षणासोबतच देशभक्ती, संस्कार व संस्कृतीचे धडे – राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मोदी लर्निंग सेंटर येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल आणि टोडलर्स व्हिले प्री-स्कुल यांचे व्हिस्टा - २०२५-२६ हे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन अंबाजोगाई येथे सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी शाळेच्या भव्य प्रांगणात उत्साहात करण्यात आले. या स्नेहसंमेलनातून छत्रपती शिवरायांचा स्वराज्यनिर्मितीच्या



प्रेरणादायी इतिहासाचे सजीव दर्शन घडले. यावेळी बोलताना संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, दरवर्षी वेगवेगळी थीम असते. यावर्षी छत्रपती शिवराय स्वराज्याचे शिल्पकार ही स्नेह संमेलनाची थीम आहे. वंदनीय महाराजांचा प्रेरक इतिहास मांडून विद्यार्थी सादरीकरण करणार आहेत. न्यु व्हिजन पब्लिक स्कूलच्या माध्यमातून इंग्रजी माध्यमाच्या दर्जेदार शिक्षणासोबतच देशभक्ती, संस्कार व संस्कृतीचे धडे विद्यार्थ्यांना दिले जातात असे मोदी म्हणाले. न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्याचा अतिशय दिमाखदार उद्घाटन समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात संपन्न झाला. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी होते. तर व्यासपीठावर संस्थेचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## चौकशीची जाहीर नोटीस

**बदल अर्ज क्रमांक – १३२३/२०२५ कलम– २२**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र. :- ज्ञानेश्वर परिवार बहुउददेशीय सेवाभावी संस्था, गायकवाड जळगांव, ता. गेवराई, जि. बीड, एफ २१३७५/बीड

**अर्जदार :- श्री परमेश्वर सोनाजी खोसे, रा. गायकवाड जळगाव, ता. गेवराई, जि. बीड)**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

धर्मादाय उप आयुक्त बीड विभाग, बीड हे वर नमुर केलेल्या बदल अर्ज यासंबंधी सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्द्यांदर चौकशी करणार आहेत:-

१. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) स्थावर मिळकत:-**

मौजे गायकवाड जळगांव, ता. गेवराई, जि. बीड, येथील गट क्रमांक २११ मधील ३० आरजमीन पैकी १० आर विना मोबदला दानपत्र दस्त क्र. ११८६/२०२५ नुसार संस्थेला दिली असून दानपत्र दस्त खता नुसार जमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| गट नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पैसे | या पैकी विक्री क्षेत्र |
|---|---|---|---|
| २११ | ६.४७ | २०.०२ | माझ्या मालकी कब्जातील ३० आर यापैकी १० आर ही जमीन |

**ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे:-**

(१) पुर्वेस माझी शिल्लक जमिन

(२) पश्चिमेस : अस्मीता हनुमंत आगरकर वैगरेंची जमिन

(३) दक्षिणेस: गेवराई शेवगांव रोड

(४) उत्तरेस: उमापुर जुना रस्ता नगर वाट

सदर मिळकतीची बाजार किंमत र.रु.६,६२,०००/- (अक्षरी र.रु. सहा लक्ष बासष्ट हजार फक्त) सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने स्वतः किंवा विधीज्ञा मार्फत पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणार काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त, बीड विभाग, बीड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी दिली.

शिक्का

(स्वाक्षरीत)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड